# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

## विधान भवन, मुंबई 1) Hydrant System, 2) Sprinkler System व 3) Fire Alarm and Detetion System स्थापित करण्याकरिता तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करणेबाबत...

विधान भवन, मुंबई येथे नव्याने 1) Hydrant System, 2) Sprinkler System व 3) Fire Alarm and Detetion System स्थापित करण्याचे प्रस्तावित असून सदर कामाकरिता तांत्रिक सल्लागार नियुक्त करण्याकरिता पुढील निकषांची पूर्तता करणाऱ्या व्यक्ती/संस्थेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. १) संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडील अधिकृत परवाना धारक असावा (License Agency) २) विविध प्रकारच्या इमारतीतील अग्निशमन यंत्रणा स्थापित करण्यासंदर्भातील दीर्घ १५ ते २० वर्षांचा अनुभव असावा. शासकीय इमारती/आस्थापना यामध्ये अग्निशमन यंत्रणा स्थापित करण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य राहील. ३) अग्निशमन यंत्रणेसंदर्भातील BIS Stds व इतर Codes प्रमाणे काम करणारा Fire Consultant असलेल्या व्यक्तीची/संस्थेची तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती करावायाची आहे.

नियुक्त करावयाच्या तांत्रिक सल्लागाराने ई-निविदा प्रक्रिया राबवून सदरहू यंत्रणा ठेकेदारामार्फत स्थापित करावयाची आहे. त्यानुषंगाने याकरीता तांत्रिक सल्लागार म्हणून केलेल्या कामाचा अनुभव, अधिकृत परवानाधारक असल्याचे प्रमाणपत्र तसेच सदर कामाकरीता आकारण्यात येणाऱ्या शुल्काचा समावेश असलेले दरपत्रक मोहरबंद पाकीटातून सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई या पत्त्यावर दिनांक २०/०२/२०२४ रोजी किंवा तत्पूर्वी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे.

दरपत्रक स्वीकृत झाल्यास त्यानुसार संबंधितास कळविण्यात येईल. मात्र कोणतेही दरपत्रक स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे. कृपया यांची नोंद घ्यावी, ही विनंती.

**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.**